| | | | |
|---|---|---|---|
| **MHCH090000302023** | दाखल तारीख | : | २५.०१.२०२३ |
| | नोंद तारीख | : | २५.०१.२०२३ |
| | निकाल तारीख | : | ०८.०५.२०२६ |
| | कालावधी | : | ०३व. ०३म. १३ दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी गोंडपिपरी यांच्या न्यायालयात**
**( पिठासिन अधिकारी यु. पी. शिंदे )**

**नियमित फौजदारी खटला क्र. ०३/२०२३** **निशाणी क्र. १०**

| **गुन्हा नोंद क्र. २१२/२०२२** | | |
|---|---|---|
| फिर्यादी / तक्रारदार | | महाराष्ट्र शासन मार्फत,<br>ठाणे अंमलदार<br>गोंडपिपरी पोलीस ठाणे,<br>ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. बी. धात्रक |
| आरोपी | | रविंद्र रामचंद्र येलमुले,<br>वयः ३२ वर्षे, धंदाः चालक,<br>रा.सोमनाथपूर वार्ड नं.१३, राजुरा, ता. राजूरा, जि. चंद्रपूर |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | श्री. एस. झेड. झाडे |

**भाग — ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २८.०६.२०२२ ते १८.०७.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | १७.०९.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | २५.०१.२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०१.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | ०६.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | रविंद्र रामचंद्र येलमुले | आरोपीला फौ.प्र.संहिता ४१ अ प्रमाणे नोटीस दिली. | सुचनापत्रावर सोडण्यात आले | भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ, ३२३, ५०४ व ५०६ प्रमाणे. | आरोपीला निर्दोष मुक्त करणेत आले. | | |

**भाग – क**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष**

| सा. क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | संगिता रविंद्र येलमुले | फिर्यादी | ०९ |

**ब. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | १ | दोषारोपपत्र |

**न्यायनिर्णय**

(दिनांक ०८.०५.२०२६ रोजी पारीत)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये असलेला दोषारोप सिध्दतेसाठी चालविण्यात आला आहे .

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे**

२. फिर्यादीचे लग्न दि. १०.११.२०१० रोजी आरोपीसोबत जातीरिवाजाप्रमाणे झाले. तेव्हापासुन फिर्यादी आरोपीसोबत राहत होती. आरोपीपासुन फिर्यादीला मुलबाळ नाही. सात वर्षापर्यंत फिर्यादीला चांगले वागविले. फिर्यादीचा पती ट्रक ड्रायव्हर असून त्यास दारु पिण्याची सवय असल्याने तो नेहमी घरी दारु पिऊन यायचा व कोणत्या न कोणत्या कारणावरुन फिर्यादीसोबत झगडा भांडण करुन तु मी तुला नांदवत नाही, तु आपल्या बापाच्या घरी जा असे म्हणून फिर्यादीला हाताबुक्क्यांनी मारपीट करुन तिला घराच्या बाहेर काढून

घराला ताला लावुन ठेवत होता.

३. दि.२८.०६.२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजता आरोपी दारु पिऊन घरी आला. फिर्यादीने त्याला जेवण वाढले तेवढ्यात त्याला मित्राचा फोन आला तेव्हा पती बाहेर जाण्यास निघाला असता फिर्यादी त्याला दारु पिऊन व गांजा पिऊन आहे परत कशाला जाता असे म्हणाली. तेव्हा आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन हाताबुक्क्यांनी मारपीट करुन "तुझ्या आईच्या घरुन पैसे आणि सोन घेऊन ये घरी फुकट बसुन खाऊ नको मी तुला पोसणार नाही" असे म्हणून फिर्यादीला व तिच्या घरच्या लोकांना शिवीगाळ केली. दि.२९.०६.२०२२ रोजी फिर्यादी तिचे माहेरी निघुन आली. तिला तिच्या पासुन शारिरीक व मानसिक त्रास असल्याने फिर्यादीने पोलीस स्टेशन गोंडपिपरी येथे रिपोर्ट देण्यास आली. तेव्हा तिला महिला तक्रार निवारण कक्ष बल्लारपूर येथे दि.०५.०७.२०२२ रोजी पाठविण्यात आले. परंतु तिथे फिर्यादीच्या पतीला विचारले असता त्याने फिर्यादीला ठेवण्यास नाकारले. त्यामुळे फिर्यादीने गोंडपिपरी पोलीस स्टेशन येथे येऊन फिर्याद दाखल केली.

४. सदर तक्रारीवरुन गु.र.क्र.२१२/२०२२ भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ, ३२३, ५०४ व ५०६ अन्वये दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास नंदकिशोर वासुदेव माहूरकर, नाईक पोलीस अंमलदार ब.नं.५७७ यांनी केला. तपासादरम्यान आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१) (अ) प्रमाणे नोटीस दिली. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीविरुध्द पुरावा गोळा झाल्याने दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

५. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपी विरुध्द निशाणी ०६ वर दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

६. संपरिक्षेदरम्यान अभियोग पक्षातर्फे तक्रारदार सा.क्र.१ संगिता रविंद्र येलमुले (नि.क्र.०९) यांची साक्ष नोंदविलेली आहे. सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षाच्या कथनास पुष्टी देणारी साक्ष न दिल्याने तपास अधिकारी किंवा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली

नाही. प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध पुराव्याचे स्वरुप तसेच आरोपी व फिर्यादी यांनी नि. क्र. ८ तडजोडीद्वारे आपसात प्रकरण मिटविल्याची बाब विचारात घेऊन तसा नि.क्र.१ खाली आदेश पारीत करण्यात आला.

७. आरोपींविरुध्द पुरावा न आल्यामुळे आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

८. प्रस्तुत खटल्यात अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर.बी.धात्रक व आरोपीचे विधीज्ञ श्री. एस.झेड.झाडे यांचा युक्तीवाद ऐकला.

९. अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, युक्तीवाद तसेच आरोपीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद विचारात घेऊन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे ते येणेप्रमाणे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दि.२८.०६.२०२२ ते दि.१८.०७.२०२२ च्या दरम्यान सोमनाथपूरा वार्ड.नं.१३, राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर येथे आरोपी फिर्यादीस वेळोवेळी शिवीगाळ करुन हाताबुक्क्यांनी मारपीट करुन आईचे घरुन पैसे आणि सोन घेवुन ये, फुकट बसुन खाऊ नको असे म्हणून तिचा शारिरीक, मानसिक छळ केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नाही. |
| २ | दि. २८.०६.२०२२ रोजी १०.०० वाजेच्या दरम्यान मौजा सोमनापुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर येथे आरोपीने फिर्यादीला हाताबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ३ | उपरोक्त नमुद तारीख व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन अपमानीत केले असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | नाही. |
| ४ | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला धमकी दिल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का? | नाही. |
| ५. | आदेश काय? | आरोपीस निर्दोष |

मुक्त करण्यात येते.

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र.१ ते ४ साठी</u> :

१०. उपरोक्त सर्व मुद्दे हे ऐकमेकांशी संबंधित असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीतपणे चर्चेकरिता घेतले आहेत.

११. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचा असलेला गुन्हा सिध्द करण्यासाठी ''आरोपीने फिर्यादीला वेळोवेळी शिवीगाळ करुन हाताबुक्क्यांनी मारपीट करुन आईचे घरुन पैसे आणि सोन घेवुन ये, फुकट बसुन खाऊ नको असे म्हणून तिचा शारिरीक, मानसिक छळ केला, तसेच तिला हाताबुक्कयांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवुन तिला शिवीगाळ केली व धमकी दिली'' या बाबी अभियोग पक्षाने सिध्द केल्या पाहिजे.

१२. अभियोग पक्षाचा पुरावा नोंदविण्यापूर्वी उभय पक्षांनी प्रस्तुत प्रकरण त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर समोपचाराने मिटले असल्याबाबत संयुक्त तडजोड पुरसिस (नि.क्र. ०८) दाखल केली आहे. परंतु सदरचा खटला तडजोडपात्र नाही.

१३. अभियोग पक्षाने आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी सा.क्र. १ संगिता हिचा पुरावा नोंदवला आहे. तिच्या पुराव्यात असे आले की, आरोपी हा तिचा पती आहे. सन २०१० मध्ये तिचे आरोपीसोबत तिच्या आईच्या घरी रितीरिवाजाप्रमाणे लग्न झाले होते. लग्नानंतर ती तिच्या पतीच्या घरी राजुरा येथे नांदण्यास गेली होती. तेथे गेल्यानंतर ते चांगले राहिले. त्यानंतर तिचा आरोपीसोबत किरकोळ कारणावरुन किरकोळ स्वरुपाचा वाद झाला होता. त्यामुळे तिने रागाच्या भरात पोलीस ठाण्यात जाऊन रिपोर्ट दिली होती. सदर साक्षिदार ही प्रकरणास सुसंगत साक्ष देत नसल्याने त्यांना भारतीय पुरावा अधिनियमाचे कलम १५४ प्रमाणे सूचक प्रश्न विचारण्यात आले. त्यामध्ये तिने आरोपीने फिर्यादीला वेळोवेळी

शिवीगाळ करुन हाताबुक्क्यांनी मारपीट करुन आईचे घरुन पैसे आणि सोन घेवुन ये, फुकट बसुन खाऊ नको असे म्हणून तिचा शारिरीक, मानसिक छळ केला, तसेच तिला हाताबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवुन तिला शिवीगाळ केली व धमकी दिली हे स्पष्टपणे नाकारले आहे. तसेच, आरोपीसोबत त्यांची आपसात तडजोड झालेली असल्याचे मान्य केले आहे. आरोपीला गुन्हयामध्ये गोवण्याइतपत पुरावा अभियोगपक्षाला अभिलेखावर आणता आलेला नाही.

१४. फिर्यादी व आरोपी यांनी मिळुन न्यायालयात पुरसीस (नि.०८) द्वारे कळविले की, त्यांनी तडजोड केली आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणातील गुन्हा फौजदारी प्रकिया संहिता कलम ३२० (१)(२) मध्ये आपसात मिटविण्यासारखे नसल्यामुळे फिर्यादी व आरोपी दरम्यान झालेल्या तडजोडीला कायदेशीर मान्यता व परवानगी देण्यात आली नाही. दोन्ही पक्षांनी आपआपसात तडजोड केल्याचे दिसते. त्यामुळे फिर्यादीने किंवा साक्षीदाराने खोटा साक्षीपुरावा दिला असे म्हणत त्याच्या विरुध्द फौजदारी प्रकिया संहिता कलम ३४४ किंवा ३४० प्रमाणे कोणतीही कार्यवाही करणे योग्य होणार नाही. फिर्यादीने व साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, त्यांनी आरोपी सोबत प्रकरण आपसात मिटवलेले आहे, याच कारणामुळे सरकारी अभियोक्ता किंवा अभियोग पक्षाने पुढे कोणतेही साक्षीदार तपासले नाही. फौजदारी प्रकिया संहिता कलम ३११ प्रमाणे या न्यायालयाला सुध्दा खटल्याचा निर्णय न्यायपणे होण्यासाठी कोणत्याही व्यक्तीचा साक्षीपुरावा आवश्यक असल्याचे वाटले नाही. त्यामुळे न्यायालयाद्वारे सुध्दा कोणताही साक्षीदार तपाासण्यात आलेला नाही.

१५. एखादया महिलेला तिचे पती व पतीच्या नातेवाईकांनी क्रुर वागणुक दिली हे सिध्द करण्यासाठी स्वतः पिडीत महिलेने सबळ व विश्वास पूर्ण पूरावा देणे आवश्यक आहे. भारतीय दंड विधान कलम ४९८-अ अंतर्गत येणाऱ्या गुन्हयामध्ये किरकोळ किंवा दैनंदिन भांडणाचा समावेश होत नाही. पिडीत महिलेस होणारी क्रुर वागणूक ही काहीतरी वस्तु मिळण्यासाठी किंवा गैरकायदेशीर मागणी पूर्ण होण्यासाठी व्हावयास हवी. परंतु साक्षीदारांनी

गैरकायदेशीर मागणीबद्दल व त्यासाठी होणाऱ्या मानसिक व शारिरिक छळाबद्दल काहीही कथन केलेले नाही.

१६. साक्षीदारांनी दिलेल्या साक्षीचे अवलोकन केले असता सा.क्र.१ संगिता आणि आरोपी यांचेमध्ये किरकोळ स्वरुपाचे मतभेद निर्माण झाले होते असे कथन केले आहे. साक्षीदारांनी अभियोग पक्षाला कोणत्याही प्रकारचे सहकार्य केले नाही त्यामुळे फिर्यादीप्रमाणे कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. उपलब्ध असलेल्या साक्षीपुराव्यांवरुन 'आरोपीने फिर्यादीला वेळोवेळी शिवीगाळ करुन हाताबुक्क्यांनी मारपीट करुन आईचे घरुन पैसे आणि सोन घेवुन ये, फुकट बसुन खाऊ नको असे म्हणून तिचा शारिरीक, मानसिक छळ केला, तसेच तिला हाताबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवुन तिला शिवीगाळ केली व धमकी दिली' हे स्पष्टपणे नाकारले आहे. हे शंकांच्या पलीकडे जावुन सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, उपलब्ध असलेल्या पुराव्या आधारे व उभय पक्षामधील झालेली तडजोड यांचा विचार करता आरोपीच्या विरोधात निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र. १ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवण्यात येत आहे.

## <u>मुद्दा क्र.५ बाबत</u>

१७. वरील मुद्दयांचे निष्कर्ष नकारार्थी दिल्यामुळे आरोपीला त्याच्या विरुध्द लावण्यात आलेल्या सर्व आरोपांतुन निर्दोष मुक्त करणे योग्य होईल. आरोपीला फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थित होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता प्रतीभुतीसह जमानतपत्र देण्याचे निर्देश देण्यात येत आहे. अंततः मी मुद्दा क्रमांक ५ च्या उत्तरात आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे असे म्हणुन पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी रविंद्र रामचंद्र येलमुले यास भारतीय दंड विधान कलम ४९८-अ, ३२३, ५०४ व ५०६ प्रमाणे असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्रे व जमानत पत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७-अ प्रमाणे अपिल न्यायालयासमोर उपस्थीत होण्यासाठी पुढील सहा महिन्याकरीता रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र दयावे.

(खुल्या न्यायालयामध्ये आदेशीत व उद्घघोषित.)

(Sd-)
(यु. पी. शिंदे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
गोंडपिपरी.

ठिकाण :- गोंडपिपरी
दिनांक :- ०८.०५.२०२६.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : उमेश रामप्रसाद आमटे |
| न्यायालयाचे नाव | : दिवाणी व फौजदारी न्यायालय, गोंडपिपरी |
| न्यायनिर्णयाची तारीख | : ०८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : ०८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : ०८.०५.२०२६ |